24 OCT 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मारुलकर दाम्पत्याच्या दातृत्वातून शिक्षणाला बळ

# सव्वावर्षात साकारले 'अस्मिता वसतिगृह'

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. २३ :** शिवाजी विद्यापीठाचे माजी साहाय्यक कुलसचिव पंडित मारुलकर आणि त्यांच्या पत्नी रजनी यांनी त्यांची दिवंगत कन्या अस्मिता हिच्या स्मरणार्थ विद्यापीठाला ३५ लाखांचा निधी दिला. त्यातून विद्यापीठात सव्वावर्षात साकारण्यात आलेल्या 'अस्मिता संशोधक विद्यार्थिनी' वसतिगृहाचे आज उद्घाटन झाले.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते वसतिगृहाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मारुलकर दाम्पत्य प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'अस्मिता संशोधक विद्यार्थिनी वसतिगृह हे आई-वडिलांचे आपल्या दिवंगत मुलीप्रती प्रेमाचे, ज्ञानाप्रती आस्थेचे चिरंतन प्रतीक म्हणून ओळखले जाईल. मारुलकर दाम्पत्याच्या दातृत्वातून हे वसतिगृह तर उभारलेचं; पण लोकवर्गणीतून विद्यार्थिनींसाठी 'लोकस्मृती वसतिगृह' निर्माण करण्याची संकल्पनादेखील साकार झाली आहे.'

या कार्यक्रमात डॉ. भारती पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सुहासिनी पाटील, महादेव देशमुख, रघुनाथ ढमकले, जगदीश सपकाळे, केदार मारुलकर, तानाजी चौगुले, रामचंद्र पवार, रमेश पोवार, रणजित यादव, प्रतिमा पवार, माधुरी वाळवेकर, अमित कांबळे उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. दरम्यान, मारुलकर दाम्पत्याने विद्यापीठाकडे १५ ऑगस्ट २०२२ रोजी निधी सुपूर्द केला. त्यातून विद्यापीठाने १५ दिवसांत 'कमवा व शिका विद्यार्थिनी वसतिगृहाच्या शेजारील जागा निश्चित करून ३० ऑगस्ट रोजी संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाची पायाभरणी केली. त्यानंतर अवघ्या सव्वावर्षात वसतिगृहाची इमारत उभी राहिली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अस्मिता संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाच्या इमारतीत फित कापून प्रवेश करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. यावेळी शेजारी डावीकडून केदार मारुलकर, पंडित मारुलकर, प्रमोद पाटील, रमेश पोवार, रघुनाथ ढमकले, रजनी मारुलकर उपस्थित होते.

### समाधान मनी दाटून आले

या वसतिगृहाच्या रुपाने अस्मिताचे चिरंतन स्मारक विद्यापीठात उभे राहिल्याचे समाधान मारुलकर दाम्पत्याच्या मनी दाटून आले. एका डोळ्यांत तिच्या आठवणींचे आसू, अन् दुसऱ्यात समाधान अशी त्यांची अवस्था झाली.

### २४ विद्यार्थिनींना प्रवेश मिळणार

'अस्मिता संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाची इमारत तळमजला आणि पहिला मजला (एकूण ३५०० चौरस फूट बांधकाम) अशी दुमजली आहे. इमारतीमध्ये आठ प्रशस्त खोल्या आहेत. या वसतिगृहात एकूण २४ संशोधक विद्यार्थिनींना प्रवेश दिला जाणार आहे. आठवड्याभरात त्याची प्रक्रिया सुरू होईल', अशी माहिती कुलसचिव डॉ. शिंदे यांनी दिली.

24 OCT 2023 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक माध्यमांमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान

■ डॉ. शिवाजी जाधव यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
रुकडी

स्त्रियांना समाजामध्ये जसे दुय्यम स्थान आहे. तसेच सामाजिक माध्यमामध्येही त्यांना दुय्यम स्थान असल्याचे दिसून येते, असे मत शिवाजी विद्यापिठाचे जर्नालिजम आणि मास कम्युनिकेशन विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांनी व्यक्त केले.

येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयात जेंडर चॅम्पियन क्लबच्यावतीने आयोजित सामाजिक माध्यम व स्त्रिया यावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांतकुमार कांबळे होते.

डॉ. जाधव म्हणाले, सामाजिक माध्यमांमुळे जग फारच जवळ आले आहे. परंतु या सामाजिक माध्यमांचा वापर सतत सुरु असताना दिसून येतोय. चांगली माहिती पाठविणारे कमी आहेत. आपण फक्त ग्राहक आहोत. या प्रसारमाध्यमांनी आपलं जगणं ताब्यात घेतले आहे. विशेषतः युवा पिढी प्रसार माध्यमांमध्ये बहुतेकदा गुंतून राहिलेली आहे. सामाजिक माध्यमांच्या वापरात मूल्यांची घसरण झाली आहे. म्हणून प्रसार माध्यमांच्या वापरावर नियंत्रण आणले पाहिजे.

डॉ. जाधव म्हणाले, सामाजिक माध्यमांच्या वापरात मूल्यांची घसरण झालेली दिसून येते. म्हणून प्रसार माध्यमांचा वापरावर नियंत्रण यायला हवे बऱ्याच वेळे स चुकीची माहिती वारंवार दाखावली जाते आणि ती खरी आहे असे भासविले जाते त्यामुळे प्रसार माध्यमांचा वापर करताना काळजीपूर्वक करावा. आपल्याकडे आलेली माहिती इतरांना पाठविताना तिची खातरजमा करा. मगच इतरांना पाठवा म्हणजे चुकीच्या संदेशाचा प्रसार होणार नाही.

स्वागत व प्रास्ताविक डॉ. शर्मिला साबळे यांनी केले. अमर बुल्ले यांनी आभार मानले. सूत्रसंचालन क्षितिजा बागडी यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2023

लोकमत


# आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत शाहू कॉलेजची बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत कोल्हापूरच्या राजर्षी शाहू कॉलेजने इचलकरंजीच्या नाईट कॉलेजचा पराभव करीत विजेतपदाला गवसणी घातली.

विजयी संघाला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विक्रमसिंह नांगरे, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडिगिरी, डॉ. गणेश लवंगारे यांचे मार्गदर्शन, तर रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या सरोज (माई) पाटील, प्रशांत पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य अजित पाटील, महाविद्यालय विकास समिती अध्यक्षा संगीता पाटील, प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, उपप्राचार्य डॉ. सिंधू आवळे, प्रा. पी. एस. चौगुले आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
24 OCT 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : 'मेरी माटी, मेरा देश' उपक्रमांतर्गत विद्यापीठात काढलेल्या अमृत कलश यात्रेत सहभागी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

# शिवाजी विद्यापीठात अमृत कलश यात्रा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'मेरी माटी मेरा देश' उपक्रमातंर्गत कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ३३ तालुक्यातून सुमारे ५० संकलित माती अमृत कलश यात्रा राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यापीठामध्ये काढण्यात आली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अमृत कलशाचे स्वागत केले. गेल्या दीड महिन्यापासून राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'सेल्फी विथ मिट्टी' तसेच प्रत्येक गावांतून माती संकलन करून त्यांचे कलश जमा करण्याचे काम सुरू आहे. जमा झालेल्या मातीमधून थोडी माती संबंधित महाविद्यालयाच्या रोपवाटिकेमध्ये मिसळून थोडी माती अमृत कलशादवारे संबंधित विद्यापीठात संकलित करावयाची होती. संकलित माती अमृत वाटिकेमध्ये मिसळली जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2022
लोकमत

# बास्केटबॉल स्पर्धेत न्यू कॉलेजचे यश

कोल्हापूर : वारणानगर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धेत न्यू कॉलेज मुलांच्या संघाने पेठवडगावच्या विजयसिंह यादव कॉलेजचा पराभव करत विजेतेपदाला गवसणी घातली. या विद्यार्थ्यांना संस्था चेअरमन के. जी. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांचे प्रोत्साहन, तर प्रा. अमर सासने, दीपक पाटील, दत्तात्रय भोपळे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2022

लोकमत

# ‘अस्मिता’ मुलींचे वसतिगृह दिवंगत मुलीप्रती प्रेमाचे प्रतीक

## डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे अस्मिता संशोधक विद्यार्थिनी वसतिगृह हे आईवडिलांचे आपल्या दिवंगत मुलीप्रती प्रेमाचे आणि ज्ञानाप्रती आस्थेचे चिरंतन प्रतीक म्हणून ओळखले जाईल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे माजी सहायक कुलसचिव पंडित सदाशिव मारुलकर आणि त्यांच्या पत्नी रजनी मारुलकर यांनी त्यांची कन्या अस्मिता हिच्या स्मरणार्थ विद्यापीठास दिलेल्या ३५ लाख रुपयांच्या निधीमधून विद्यापीठात उभारण्यात आलेल्या ‘अस्मिता संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहा’च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

अस्मिता मारुलकर हिच्या स्मृतींचा गहिवर तिच्या आईवडिलांसह या कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येकाच्या मनी दाटला होता.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, मारुलकर दाम्पत्याने शिवाजी विद्यापीठास दिलेला ३५ लाखांचा निधी हा आजपर्यंत कोणत्याही व्यक्तीने व्यक्तिगत पातळीवर दिलेला सर्वाधिक निधी आहे. यातून त्यांनी विद्यापीठाशी चिरंतन नाते जोडले आहे. या त्यांच्या दातृत्वातून केवळ हे एकच वसतिगृह साकार झाले आहे, असे नाही; तर यातूनच लोकवर्गणीतून विद्यार्थिनींसाठी ‘लोकस्मृती वसतिगृह’ निर्माण करण्याची संकल्पना साकार झाली असून, त्या दृष्टीने लवकरच कार्यवाही करण्यात येईल.




शिवाजी विद्यापीठाच्या अस्मिता संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. डी. टी शिर्के तसेच रजनी व पंडित मारुलकर या दाम्पत्याच्या हस्ते सोमवारी कोनशिला अनावरणाने झाले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

डॉ. भारती पाटील यांनी संशोधक विद्यार्थिनींच्या गरजा लक्षात घेऊन या वसतिगृहाची विचारपूर्वक उभारणी केल्याचे लक्षात येते, असे सांगितले.

यावेळी पंडित मारुलकर यांनी अस्मिता हिच्या स्मृतींना उजाळा दिला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, रजनी मारुलकर, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. केदार मारुलकर, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, रमेश पोवार, रणजित यादव, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. माधुरी वाळवेकर, अमित कांबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2023

पुढारी

# शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती शक्य : डॉ. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

साधन सामुग्रीची उपलब्धता कमी असते तेव्हा शिक्षणाच्या माध्यमातूनच आपल्याला प्रगती साधता येऊ शकते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

पानी फाऊंडेशनच्या माध्यमातून जलसंवर्धन आणि वृक्षलागवडीची चळवळ यशस्वी करून दाखविल्याने महाराष्ट्राच्या नकाशावर ठळकपणे स्थान अधोरेखित केलेल्या बिदाल (ता. माण, जि. सातारा) येथील कामाची पाहणी करण्यासाठी डॉ. शिर्के यांनी या गावाला भेट दिली. त्यावेळी येथील ग्रामस्थ व विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.

शिक्षणाच्या माध्यमातूनच आपल्याला प्रगती साधता येऊ शकते, याच्या जाणीवा प्रखर असतात. त्यामुळे येथील युवकांनी ही जाणीव मनात ठेवून अभ्यास केला आणि विविध स्पर्धा परीक्षांत यश मिळविले. मात्र, त्यांनी आपल्या गावाकडे पाठ फिरविली नाही, ही बाब अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यामुळे गावच्या विकासकामांमध्ये योगदान असल्याचे दिसते.

यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, शिवाभाऊ जगदाळे, प्रताप भोसले, सुरेश जगदाळे, सुरेशभाऊ जगदाळे, हणमंतराव जगदाळे उपस्थित होते.

24 OCT 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पर्यावरणपूरकतेकडे समुदायाचा कल वाढणे गरजेचे'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अक्षय ऊर्जेचा वापर वाढवून पर्यावरणपूरकता जपण्याकडे जागतिक समुदायाचा कल वाढविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित पाचदिवसीय 'ग्यान' कार्यशाळा समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) येथील वरिष्ठ संशोधक डॉ. पी. पी. वडगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. समारंभाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख होते. कुलगुरू डॉ.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'ग्यान' कार्यशाळेच्या समारोपाचे प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांचे स्वागत करताना डॉ. कैलास सोनावणे. सोबत डॉ. सागर डेळेकर, डॉ. महादेव देशमुख आदी.**

कामत म्हणाले, खनिज उर्जासाधनांच्या अतिरेकी वापराचे दुष्परिणाम पर्यावरणावर मोठ्या प्रमाणावर होत आहेत. त्यामुळे अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढविणे आवश्यक आहे.

समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी कार्यशाळेचा आढावा घेतला. रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. जी. बी. कोळेकर यांनी आभार मानले.